## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

# नागपूर मेट्रो आणि बटुकभाई ज्वेलर्स ‘महाकार्ड’ चा वापर करण्याकरिता करणार सहकार्य



नागपूर: नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीकडे प्रोत्साहित करण्यासाठी नागपूर मेट्रोने एक आगळावेगळा पुढाकार घेत स्थानिक व्यावसायिक समूह मे.बटुकभाई ज्वेलर्स यांच्यासोबत हातमिळवणी केली आहे. या उपक्रमाचा उद्देश नागपूर मेट्रोचा प्रवास अधिक सुलभ, सोयीस्कर आणि प्रसारक्षम बनवणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत मे.बटुकभाई सन्स ज्वेलर्स प्रा. लि. यांचे श्री भरत शेट यांनी त्यांच्या ग्राहकांना भेटस्वरूप देण्यासाठी नागपूर मेट्रोकडून १०० महाकार्ड खरेदी केले आहेत. महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रवण हर्डीकर यांनी प्रारंभी हे १०० महाकार्ड बटुकभाई ज्वेलर्सला प्रदान केले.

या सहकार्यामुळे नागपूर मेट्रोकडे स्थानिक व्यावसायिक समुदायाचा वाढता विश्वास आणि पाठिंबा अधोरेखित होतो. नागपूर मेट्रो ही विश्वासार्ह, कार्यक्षम व ग्राहक-स्नेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असल्याचा पुनरुच्चार यातून दिसून येतो. तसेच, पर्यावरणपूरक नागरी गतिशीलतेला आणि सामाजिक उत्तरदायित्वाला व्यावसायिक समुदायाकडून मिळणारा पाठिंबा याचेही हे एक उत्तम उदाहरण आहे.

संवाद दरम्यान नागपूर मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी महाकार्डचे फायदे स्पष्ट केले. सदर स्मार्ट कार्डचा प्रवास अधिक सोपा, रोकड विरहित आणि जलद करते तसेच प्रत्येक प्रवासावर १०% सूट प्रदान करते. विद्यार्थ्यांसाठी ३०% प्रवास सवलत उपलब्ध होते.

महाकार्डमुळे मेट्रो स्थानकांवरील प्रवेश आणि निर्गमन अधिक जलद होते, वेळेची बचत होते, प्रत्येकवेळी तिकीट खरेदी करण्याची गरज संपते आणि संपूर्ण मेट्रो नेटवर्कवर त्रासमुक्त प्रवास करणे शक्य होते. महाकार्डचा नियमित वापर शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक प्रवासास प्रोत्साहन देतो तसेच शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत करतो.

मे.बटुकभाई सन्स ज्वेलर्स प्रा. लि. यांनी या सहकार्याचे स्वागत केले व नागरिकांमध्ये मेट्रो प्रवास वाढवण्याच्या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला. ग्राहकांना महाकार्ड भेट देणे हे ग्राहक संवाद अधिक मूल्यवान बनवते तसेच पर्यावरण संवर्धनाला हातभार लावते, असे श्री भरत शेट यांनी यावेळी सांगितले.

सुरक्षित, विश्वासार्ह, कार्यक्षम, परवडणारी, प्रवासी-अनुकूल आणि पर्यावरणस्नेही सार्वजनिक वाहतूक देण्याच्या आपल्या ध्येयाशी निगडित राहून नागपूर मेट्रो अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे स्थानिक व्यवसाय, संस्थां व संघटनांसोबत सातत्याने सहकार्य करत आहे. या उपक्रमामुळे जनजागृती वाढते, प्रवासीसंख्या वाढते आणि सार्वजनिक वाहतूक संस्कृती अधिक दृढ होते.